## <u>प्रसिध्दी पत्रक</u>

**आरोपी लोकसेवक श्री सुधाकर नारायणराव घुले, वय ५३ वर्षे, पद ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांनी ४०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री सुधाकर नारायणराव घुले, वय ५३ वर्षे, पद ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद<br>रा. प्लॉट नंबर २, प्लॅट नंबर ६, एन-१२, टिव्ही सेंटर, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ४०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड व विहिर खोदकामाचा ग्रामसभेचा ठराव देण्याकरिता |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्याकडे रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड व विहिर खोदकामाचा ग्रामसभेचा ठराव देण्याकरिता लोकसेवक श्री. सुधाकर नारायणराव घुले, ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता कन्नड, जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येकी एक हजार रुपये या प्रमाणे चार जणांचे ४०००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना सुधाकर नारायणराव घुले, ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सुधाकर नारायणराव घुले, ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे एक हजार रुपये प्रमाणे चार जणांचे वरील नमुद कारणासाठी ४०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दिनांक ०१/०२/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, सुधाकर नारायणराव घुले, ग्रामविकास अधिकारी, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ४०००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई करण्यासाठी पोलीस अधिक्षक डॉ.अरविंद चावरीया, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, प्रभारी अपर पोलीस अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गणेश धोक्रट यांनी कारवाई केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, सुनिल पाटील, पो.शि. विलास चव्हाण, केदार कंदे, कपिल गाढेकर व चालक पोशि चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) <u>sp1acbaurangabad@gmail.com</u>, 2) <u>spacbaurangabad@mahapolice.gov.in</u>

01.02.2020

अप्पर पोलीस अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.